जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ :- कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील येथील रसायनशास्त्र **प्रशाळेत** *“प्रॉस्पेक्टस ऑफ पॉली (विनायल क्लोराईड)”* या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन दि. १३ जानेवारी, २०२६ रोजी करण्यात आले.

ही कार्यशाळा रसायनशास्त्र प्रशाळेच्या तसेच विद्यापीठातील **रासायनिक तंत्रज्ञान संस्था** विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेचा मुख्य उद्देश पॉलिमर क्षेत्रातील नव्याने उदयास येणारे ट्रेंड्स, औद्योगिक उपयोग तसेच पॉली (विनायल क्लोराईड) तंत्रज्ञानातील करिअरच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना सखोल माहिती देणे हा होता. सदर कार्यशाळा रसायनशास्त्र प्रशालेने मुंबई येथील *इंडियन विनायल कौन्सिल* यांच्या सहकार्याने आयोजित केली होती. या निमित्ताने इंडियन विनायल कौन्सिलच्या वतीने पॉलिमर क्षेत्रातील विविध नामांकित औद्योगिक संस्थांमधील चार तज्ज्ञ वक्त्यांना आमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये इंडियन विनायल कौन्सिलचे जनरल सेक्रेटरी श्री. अभिजीत पाटील, रिलायन्स इंडस्ट्री, मुंबई येथील **सौ.**अरुणाकुमारी, रिअजन्स इंडिया एडीटीव्हज प्रा. लि. येथील श्री. तुषार देशपांडे तसेच डॉ. हिमालय वार्डीकर यांचा समावेश होता. या सर्व वक्त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्रातील अनुभव, औद्योगिक उपयोग आणि करिअर मार्गदर्शन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान रसायनशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा. दीपक दलाल यांनी भूषविले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. विकास गीते यांनी जबाबदारी सांभाळली, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मयूर पाटील संशोधक विद्यार्थी (रसायनशास्त्र प्रशाळा) यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत शिक्षणशास्त्र विभागामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एम.एड. (Master of Education) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. सदर प्रवेश प्रक्रिया ही राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (MAH-M.Ed. CET) मार्फत राबविण्यात येत असून, विद्यापीठात एकूण ५० जागा उपलब्ध आहेत.

एम.एड. प्रवेशासाठी बी.एड. उत्तीर्ण किंवा बी.एड. अपिअर असलेले तसेच पदवीसह डी.टी.एड. उत्तीर्ण उमेदवार पात्र ठरणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी सामायिक प्रवेश परीक्षेसाठीचा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. १ जानेवारी २०२६ पासून सुरू झाली असून, अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. २० जानेवारी २०२६ आहे.

सीईटीसाठी अर्ज, माहिती पुस्तिका तसेच प्रवेश प्रक्रियेची सविस्तर माहिती https://mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागामध्ये सीईटीचा ऑनलाईन अर्ज विनामूल्य भरून देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासोबतच प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन वर्गांचे आयोजनही विभागामार्फत करण्यात येणार आहे.

एम.एड. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी राज्यस्तरीय सीईटी परीक्षा देणे अनिवार्य असल्याचे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विभागामार्फत कळविण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी इच्छुक उमेदवारांनी शिक्षणशास्त्र विभागाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा किंवा विभागप्रमुख डॉ. मनिषा इंदाणी दुरध्वनी क्र.0257-2257437 व डॉ. संतोष खिराडे मो. 9960772604 यांच्याशी संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १४ :- कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील मराठीविभागातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवडानिमित्त १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज दि. १४ जानेवारी २०२६ रोजी प्रशाळेतील ‘साहित्य सृजन’ या भित्तीपत्रिकेचे विमोचन करून पंधरवड्याला सुरुवात करण्यात आली.

यासाठी प्रशाळेतीलविद्यार्थ्यांनी खानदेशातील आदिवासी 'पावरा' आणि 'तडवी' तसेच 'गुर्जर' या अल्पसंख्याक समुदायाच्या बोली भाषेतील कविता आणि त्या बोलींची माहिती लिहिलेल्या 'साहित्य सृजन' भित्तीपत्रिका तयार केल्या होत्या. या कार्यक्रमासाठी विद्यापीठात गवंडी काम करण्यासाठी आलेल्या सौ. अनिता सुर्यवंशी यांना आमंत्रित करण्यात आले. तर अध्यसक्षस्थानी केंद्राचे संचालक प्रा. म.सु. पगारे होते.

यावेळी अनिता सुर्यवंशी (जबलपूर, म.प.) यांचा पुष्पगुच्छ आणि शाल देऊन प्रा. म.सु. पगारे यांनी सन्मान केला. यावेळी ते म्हणाले की, बोलीभाषांचा मूळस्त्रोत हा गाव-खेडे असून आजपर्यंत बोलींचे जतन हे गावातील अशिक्षीत, अडाणी लोकांकडूनच झाले आहे. या निरक्षर लोकांनी बोलींच्या जतनसंवर्धना बरोबरच आपल्या संस्कृतीला टिकवून ठेवण्याचे कार्य केले आहे. म्हणूनच आजच्या या कार्यक्रमात बोलीभाषा बोलणाऱ्या गाव खेड्यातील अडाणी लोकांच्या प्रतिनिधी म्हणून आपण आज अनितीताई यांना आमंत्रित केले आहे. त्यांच्या हस्ते झालेल्या बोली भाषेच्या भित्तीपत्रिकांचे विमोचन खऱ्या अर्थाने यशस्वी झाले असल्याचे समाधानही यावेळी प्रा. म.सु. पगारे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहा लाम्हणे यांनी केले. तसेच कार्यक्रमास मराठी,हिंदी आणि इंग्रजीविभागातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: १४ जानेवारी, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता